# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे - ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक: ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
ईमेल/ Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक क्र. 45 /2024

**विषय : संशोधन मार्गदशकांकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती अद्ययावत करण्याबाबत.**

**संदर्भ :**
1. **विद्यापीठाचे परिपत्रक क्र.** 196/2023 **दिनांक:** 04/09/2023
2. **शिक्षक मान्यता कक्षाचे परिपत्रक क्र.** 278/2023 **दि.** 08/11/2023
3. **विद्यापीठ परिपत्रक क्र.** 07/2024 **दि.** 09/01/2024
4. **विद्यापीठ परिपत्रक क्र. शै. प्रवेश**/318 **दि.** 24/01/2024
5. **महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक: बीसीसी** 2024/**प्र.क्र.**75/16-**क दि.** 27 **फेब्रुवारी,** 2024

उपरोक्त संदर्भ क्र. 4 परिपत्रकान्वये पीएच्.डी. मान्यताप्राप्त संशोधन मार्गदर्शकांकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती अद्ययावत करण्यासाठी संशोधन केंद्र व संशोधन मार्गदर्शकांसाठी मार्गदर्शक सूचनेनुसार विहीत मुदतीत आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी कळविण्यात आले होते. परंतु नुकतेच महाराष्ट्र शासनाने सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गाकरिता नव्याने 10 टक्के आरक्षण लागू केले असल्याने संशोधन केंद्रांकडे उपलब्ध असलेल्या रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय आरक्षण बदलणार आहे तसेच काही संशोधन मार्गदर्शकांकडे नव्याने मान्यता किंवा त्यांचेकडील संशोधन विद्यार्थ्यांचे पीएच्.डी. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यामुळे त्यांचेकडील रिक्त झालेल्या जागा अद्ययावत करावयाच्या आहेत. त्यामुळे संदर्भ क्र. 5 च्या शासन निर्णयानुसार आरक्षणामध्ये बदल झाला असल्याने रिक्त जागा किंवा यापूर्वी अद्ययावत केलेल्या रिक्त जागा अद्ययावत करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने मा. विभागप्रमुख, विद्यापीठ विभाग व मा. प्राचार्य/संचालक सर्व संशोधन केंद्र यांना कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार जागा अद्ययावत करण्याबाबत दि. 12 मार्च, 2024 पर्यंत कार्यवाही करावी. यापुढे असेही कळविण्यात येते की, संशोधन मार्गदर्शकांना त्यांचेकडील रिक्त जागा अद्ययावत करण्यास व संशोधन केंद्रांना प्रवर्गनिहाय जागास मान्यता देण्यास वरील नमूद तारखेनंतर कोणत्याही प्रकारची मुदतवाढ दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदर प्रक्रिया पूर्ण करताना काही तांत्रिक अडचण आल्यास, प्रशासकीय भवन, पहिला मजला येथील आय. टी. सपोर्ट संपर्क क्र. 020-71533633 अथवा phdtracking_support@pun.unipune.ac.in या ईमेलवर संपर्क साधावा.

गणेशखिंड, पुणे 411007 )
संदर्भ: शै.प्रवेश/ 769 )
दिनांक: 06/03/2024 )

6/3/2024
(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

**प्रत:**

| | |
|---|---|
| 1. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ<br>2. मा.प्राचार्य/मा.संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/ संशोधन केंद्र, प्रस्तुत विद्यापीठ | आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील /संशोधन केंद्रातील सर्व संशोधन मार्गदर्शकांच्या निदर्शनास आणून उपरोक्त दिलेल्या सूचनेनुसार कार्यवाही करावी. |

D:\PET 2023\Circulars.docx

## पीएच्.डी. अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया

पीएच्.डी. अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेसाठी मान्यताप्राप्त संशोधन केंद्र/संशोधन मार्गदशकांकडे रिक्त असलेल्या किंवा यापूर्वी अद्ययावत केलेल्या रिक्त जागांची माहिती अद्ययावत करण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे पूर्ण करावी.

### संशोधन मार्गदर्शकांनी करावयाची कार्यवाही

ज्या संशोधन मार्गदर्शकांनी यापूर्वी रिक्त जागा अद्ययावत केलेल्या आहेत व त्यामध्ये काही बदल नसेल तर त्यांनी कोणतीही प्रक्रिया करण्याची आवश्यकता नाही.

नव्याने मान्यता प्राप्त मार्गदर्शक, त्यांच्या पदोन्नतीने पीएच्.डी. साठी विहीत संशोधन विद्यार्थी संख्येत झालेली वाढ व वेळोवेळी त्यांच्याकडील संशोधन विद्यार्थ्यांचे पीएच्.डी. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यामुळे झालेल्या रिक्त जागा इत्यादी सर्व पात्र मार्गदर्शकांनी खालीलप्रमाणे प्रक्रिया पूर्ण करून आपल्या लॉगीनमधून ऑनलाईन पद्धतीने अद्ययावत कराव्यात.

a. Login झाल्यानंतर वैध शिक्षक मान्यता पत्र (Valid Teacher Approval) व संशोधन मार्गदर्शक मान्यता पत्र (Valid Guideship Letter) अपलोड करावे. यापूर्वी जागा अद्ययावत करताना सदरील कागदपत्रे अपलोड केली असल्यास पुन:श्च अपलोड करण्याची आवश्यकता नाही.
b. Vacant Position for Ph.D. Admission या मधून Link Open करावी.
c. Declare Vacancies या टेबल मधील Edit Tab वर Clik करावे.
d. मार्गदर्शकांना रिक्त जागांची माहिती भरताना Approval तसेच PG Recognition/Research Guide Details संदर्भातील माहिती Teacher Profile मध्ये अद्ययावत असावी.

काही मार्गदर्शकाच्या लॉगीनमध्ये पीएच्.डी. पूर्ण झालेले/संशोधन केंद्र बदलेले / प्रवेश रद्द झालेले विद्यार्थी दिसत असतील तर त्यांनी त्यांच्या लॉगीन मधून विद्यापीठाने निर्गमित केलेले Declaration/ पत्र अपलोड करावे जेणेकरून त्यांच्या लॉगीनमधून सदर विद्यार्थ्यांची नोंद रद्द करता येईल.

### संशोधन केंद्राने करावयाची प्रक्रिया:

संशोधन मार्गदर्शकांनी प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर संशोधन केंद्राच्या BOD लॉगीनमध्ये संशोधन मार्गदर्शकांनी जागा अद्ययावत केल्याबाबतचा तपशील उपलब्ध होईल, त्यानंतर खालील मुद्यास ऑनलाईन पध्दतीने मान्यता देण्यात यावी. खालील मान्यता संदर्भ क्र. 4 च्या परिपत्रकानुसार त्या वेळी दिल्या असल्यास पुन:श्च देण्याची आवश्यकता नाही.

1. संशोधन मार्गदर्शकाकडे विद्यापीठाकडून प्राप्त झालेले वैध संशोधन मार्गदर्शक मान्यता पत्र असल्याची खात्री करावी
2. संशोधन मार्गदर्शक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयात कार्यरत आहे, याबाबतची खात्री करावी.
3. संशोधन केंद्राकडे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम आहे व सदरील संशोधन मार्गदर्शक हा आपल्याच संशोधन केंद्रात पूर्णवेळ शिक्षक म्हणून कार्यरत आहे, याबाबतची खात्री करावी.

संशोधन केंद्राने ज्या संशोधन मार्गदर्शकांना Approve केले आहे त्यांच्याच अद्ययावत केलेल्या रिक्त जागांची माहिती Confirm करावी.

संशोधन केंद्रांनी त्यांच्याकडील सर्व विषयांच्या पीएच्.डी. प्रवेश प्रक्रीयेसाठी उपलब्ध प्रवर्गनिहाय रिक्त जागांची माहिती भरावी. **जरी यापूर्वी संशोधन केंद्रांनी प्रवर्गनिहाय रिक्त जागांची माहिती भरली असल्यास संदर्भ क्र. 5 अन्वये आरक्षणामध्ये बदल झाला असल्याने सर्व संशोधन केंद्रांनी सदरील माहिती भरणे अनिवार्य आहे.**

या सर्व बाबींना संशोधन केंद्रांने त्यांच्या लॉगीनमधून मान्यता दिल्यानंतरच तात्काळ विद्यापीठाच्या संकेतस्थळावर रिक्त जागांचा तपशील घोषित केला जाईल व तो घोषित झाल्याबाबतची खात्री संबंधित संशोधन केंद्रांनी https://bcud.unipune.ac.in/phd_entrance/Applicant/SearchGuideVacancies.aspx या लिंकवर करून घ्यावी. जे संशोधन केंद्रे सदरील बाबी तपासून मान्यता देतील, त्या संशोधन केंद्रांचा रिक्त जागांचा तपशील

विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द होणार आहे. संशोधन मार्गदर्शकाकडे वरीलपैकी कोणत्याही एक किंवा अधिक मुद्याबाबत त्रुटी असेल तर सदरील संशोधन मार्गदर्शक वगळता पूर्तता केलेल्या संशोधन मार्गदर्शकांना मान्यता देऊन त्यांचा तपशील घोषित करण्याबाबत कार्यवाही करावी.

संदर्भ क्र. 5 च्या शासन निर्णयानुसार आरक्षणामध्ये बदल झाल्याने यापूर्वी प्रसिध्द झालेला संशोधन केंद्रांचा रिक्त जागांचा तपशील विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून निरसित करण्यात आला आहे.

सर्व माहिती भरल्यानंतर त्याची प्रिंट शैक्षणिक प्रवेश विभागात जमा करण्याची आवश्यकता नाही.

वरीलप्रमाणे संशोधन मार्गदर्शकांकडील सर्व कागदपत्रे व्यवस्थितरित्या तपासूनच संबंधित संशोधन मार्गदर्शकांना मान्यता देण्यात यावी. वरीलप्रमाणे पीएच्.डी. प्रक्रियेत त्रुटी राहील्यास विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सुचनेप्रमाणे पीएच्.डी. अभ्यासक्रमाच्या वैधतेसंदर्भात अडचणी उद्भवू शकतात. सबब, संशोधन केंद्र प्रमुखांनी अतिशय काळजीपूर्वक वरील माहितीस मान्यता द्यावी.

*******